(१)


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७, २७५७८४०९
फॅक्स : २७५७०९६९, २७५७१६६६.


क्र.मजीप्रा/२०१०/सभा-१२१/(४६)/आ.४/७०६ दिनांक : २२ सप्टेंबर २०११

प्रति,
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२१ व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दि.२८ जून २०११ रोजी झालेल्या १२१ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

सोबत : १२१ व्या सभेचे इतिवृत्त.

आपला विश्वासू,

(द्. र. चंद्रिकापूरे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

Durge/B.Meeting

१) विशेष कार्यकारी अधिकारी (तांत्रिक/प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
२) वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र.३ व १२ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

३) सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्रादेशिक विभाग, ठाणे / पुणे / नाशिक/ औरंगाबाद/ नागपूर. आपणांस विनंती करण्यांत येते की आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. 2 वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

४) अधीक्षक अभियंता, मुख्यालय/ कार्यकारी अभियंता (तां.) म.जी.प्रा., एकसप्रेस टॉवर्स, मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.२, ५,६,७,८ व ९ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

५) उप मुख्य लेखा अधि. (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

६) आस्थापना अधिकारी (द.), म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.२ व ४ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

७) प्रशासकीय नि आस्था.अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.२ व १३ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

८) कायदा व कामगार अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.२ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

९) कार्यकारी अभियंता (यां.) म.जी.प्रा. ठाणे

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.१० वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

१०) मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी/कार्यासन अधिकारी यांच्या माहितीसाठी.
११) कक्ष अधिकारी (आस्थापना-५) यांच्या माहितीसाठी.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.५ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२१ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२१ वी सभा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २८/६/२०११ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.श्री.रणजित कांबळे, राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. प्रधान सचिव, उर्जा, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.बी.के. जणविर, विशेष कार्य अधिकारी, उर्जा, मंत्रालय, मुंबई-३२
६. श्रीमती. मालिनी शंकर, सदस्य सचिव, (वित्त व प्र.) म.जी.प्रा., मुंबई.
७. श्री. राजेंद्र होलानी, सदस्य सचिव (तां) म.जी.प्रा., मुंबई-३२

या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री.एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, नाशिक
२. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, पुणे
३. श्री.व्ही.एन. राठोड, मुख्य अभियंता,(अतिरिक्त कार्यभार) म.जी.प्रा.प्रादे. विभाग, नागपूर.
४. श्री.एस.डी. चव्हाण, वि.स. व मु.ले.अ., (अतिरिक्त कार्यभार) म.जी.प्रा., नवी मुंबई.
५. सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
६. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. शेळके, उप मुख्य लेखा अधिकारी, (अतिरिक्त कार्यभार) म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२० व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दिनांक २९.३.२०११ रोजी संपन्न झालेल्या १२० व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

(४)

कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२० व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २९/३/२०११ रोजी संपन्न झालेल्या १२० व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या प्रत्येक मुद्यावर केलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव (प्र) यांनी संचालक मंडळास अवगत केले.

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील अस्थाई (सीआरटी/सीआरपी) कर्मचाऱ्यांची एखादया नगरपालिकेने मागणी केल्यास म.जी.प्रा. कडील अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा नगर पालिकेला ठोक रक्कमेवर करारनामा करुन उपलब्ध करुन दयाव्यात जेणेकरुन त्या कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्यावर होणारा खर्च काही अंशी कमी होईल. सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी परळी नगरपरिषदेस अशाप्रकारे कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात आल्याबद्दल सांगितले.

२. म.जी.प्रा.चे १४ विभाग ५५ उप विभाग म.जी.प्रा. च्या आस्थापनेवरील ११८१ पदांसह जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यांत आली. सद्य:स्थितीत या पदांवर जे कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्या कायमस्वरुपी समावेशनाचा प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडे पाठविण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे पाठविण्यांत आला आहे. तसेच नगरपालिका/नगरपरिषदेमध्ये आवश्यकतेनुसार करारनाम्याद्वारे अतिरिक्त कर्मचारी पाठविणे शक्य असल्यास तेही तपासावे. मा.राज्यमंत्री यांच्या सूचनेप्रमाणे नगरपालिका व म.जी.प्रा. यांनी परस्पर संमतीने दरविलेले मानधन व म.जी.प्रा.चा नियमित पगार यामध्ये जो फरक असेल तो फरक म.जी.प्रा.ने देण्याबद्दल विचार व्हावा, जेणेकरुन कर्मचाऱ्यांच्या क्षमतेचा वापर होईल. वरील दोन्ही मुद्दयांबाबत प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तसेच सचिव, ग्राम विकास विभाग आणि प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी एकत्रीत बसून निर्णय घ्यावा.

३. म.जी.प्रा. चालवित असलेल्या ५२ ग्रा.पा.पु. योजना कार्यान्वित असून, त्यापैकी फक्त दोनच पा.पु. यो. फायदयात आहेत. इतर ५० पा.पु. योजना तोटयात चालत आहेत. यावर मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा.चे उपाध्यक्ष यांनी ५० पा.पु. यो. तोटयात चालण्याचे कारण काय आहे अशी विचारणा केली. यावर मा. सदस्य सचिव (तां) यांनी असे निवेदन केले की, म.जी.प्रा.मार्फत चालविण्यात येणाऱ्या एकूण ४३ योजनांवर सन २०१०-११ मध्ये रु. १४.८५ कोटी इतका खर्च झाला आहे. प्रत्यक्ष आकारणी रु. ६.१९ कोटी आहे. त्यापैकी रु. ४.०३ कोटी प्रत्यक्ष वसुली आहे. प्रत्यक्ष

७/९

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

वसुली व रु. ३.२३ कोटी शासनाकडून प्राप्त प्रोत्साहन अनुदान मिळून रु. ७.२६ कोटी महसूल प्राप्त आहे व रु. ७.५८ कोटी तोटा झाला आहे. यावर मा.अध्यक्ष महोदयांनी, सदर तोटा कमी करण्यासाठी सर्व मुख्य अभियंता यांना उद्दिष्ट ठरवून देणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले. याबाबत सदस्य सचिव (तां.) यांनी विषद केले की, पाणी पुरवठा केंद्रावरील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यापोटी तसेच पा.पु. यो. च्या विद्युत देयकावर जास्त खर्च होत असल्याने सदर योजना तोटयात चालत आहेत. या संदर्भात म.जी.प्रा.च्या सर्व मुख्य अभियंता सोबत आढावा बैठक आयोजित करण्यांत आली होती, या बैठकीत काटकसरीची उपाय योजना करुन तूट कशी कमी करता येईल यावर विशेष लक्ष द्यावे, जेणेकरुन मुख्य अभियंता यांच्या नियंत्रणाखालील प्रादेशिक विभागांतील पा.पु. केंद्रामध्ये सद्या प्रत्यक्षात होणारी तूट प्रत्येक प्रादेशिक विभागाने कमीत कमी रु. १ कोटी ने कमी करावी अशा सूचना दिल्या आहेत.

मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. यांनी म.जी.प्रा. मार्फत ज्या आपत्कालीन योजना फक्त उन्हाळयामध्येच म्हणजेच टंचाईअंतर्गत चालविण्यांत येतात, विशेषत: पावसाळयात व हिवाळयामध्ये म.जी.प्रा.कडून पाणी घेत नाहीत, त्यामुळे सदर कालावधीमध्ये पाणी पुरवठा केंद्रावरील विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यासाठी एम.एस.ई.डी.सी.एल. ला पत्रव्यवहार करुन तात्पुरत्या स्वरुपात विद्युत पुरवठा खंडित करुन घ्यावा. जेणेकरुन विद्युत देयक कमी होईल. मा.राज्यमंत्री यांनी असे सुचविले की, टंचाई कालावधीपुरत्या चालविण्यांत येणाऱ्या योजनांवर खर्च टंचाई (२२४५) खाली करण्याबद्दल तपासावे. तसेच टंचाई कालावधी पुरत्या चालविण्यात येणाऱ्या योजना जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरुनच चालविण्याबद्दल विचार व्हावा. तसेच टंचाई कालावधीत योजना चालविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडून निर्देश आल्यास त्यांचेकडून विद्युत देयकाची रक्कम भरण्याबाबत विनंती करण्यांत यावी. अथवा विद्युत देयकांची रक्कम एम.एस.ई.डी.सी.एल. ला अदा केल्यानंतरच आपत्कालीन योजना सुरु कराव्यात, तसेच टंचाईखाली पाणी पुरवठा केल्यास जिल्हाधिकाऱ्याकडून टंचाई निवारण या शिर्षाखाली वसुली करावी असे निर्देश दिले.

म.जी.प्रा.कडून चालविल्या जाणाऱ्या सर्व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमध्ये प्रत्येक गावास बल्क मीटर लावून मीटरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा असे मा.राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. एक दोन प्रादेशिक पा.पु. योजनांबाबत नागरी योजनांप्रमाणे प्रायोगिक तत्वावर सुधारणांचा कार्यक्रम राबवावा असे मा.राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. तसेच मा.मंत्रीमहोदयांनी सांगितले की, सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी मार्च महिन्यात SMS द्वारे म.जी.प्रा.च्या २५ पा.पु. केंद्रांसाठी घेतलेल्या दैनंदिन वसुली आढाव्याप्रमाणेच प्रादेशिक योजनांसाठी देखील ही पध्दत सुरु करावी.

| | |
|---|---|
| मा.अध्यक्ष तथा मंत्री,<br>पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

४. मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा. चे उपाध्यक्ष यांनी म.जी.प्रा. च्या मालकीच्या मोकळया अथवा बांधीव जागा किती आहेत तसेच जागेभोवती कंपाऊड वॉल अथवा तारेचे कुंपण घातले आहे काय, अशी विचारणा केली यावर मा. प्रधान सचिव, पा.पु. व.स्व. वि. यांनी असे निवेदन केले की, म.जी.प्रा.च्या मालकीच्या सर्व जागेचे ७/१२ चे उतारे, पॉपर्टी कार्ड उपलब्ध करुन घ्यावेत. तसेच जागा म.जी.प्रा. च्या ताब्यात आहेत, परंतु म.जी.प्रा. चे नांव अद्याप लावले नाही त्या जागेवर बोर्ड लावावेत, अशा सुचना यापुर्वीच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यावर मा. राज्यमंत्री यांनी असे सूचित केले की, ज्या जागा म.जी.प्रा. च्या ताब्यात आहेत, परंतु म.जी.प्रा.चे नांव लागले नाही याबाबत प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. व स.स. (तां) यांनी संबंधीत जिल्हा अधिकाऱ्याकडे संपर्क साधून अथवा पत्रव्यवहार करुन सदर जागा म.जी.प्रा. च्या नांवावर करुन घेण्यात यावी. यासाठी म.जी.प्रा.च्या सर्व मुख्य अभियंत्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जागेचा तपशील (मोकळया / बांधित) तसेच त्यांना फेन्स आहे किंवा नाही याची माहिती १० दिवसात पाणी पुरवठा विभागास व मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा. चे उपाध्यक्ष यांच्याकडे सादर करावी.

५. म.जी.प्रा. ची स्थापना १.१.७७ रोजी झाली असली तरीं म.जी.प्रा.चे कामकाज प्रत्यक्षात १.११.१९७९ पासून सुरु झालेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियंत्यांना दर वर्षी उत्कृष्ट अभियंता म्हणून मा. राज्यपाल यांचे शुभ हस्ते गौरव करण्यांत येतो. त्याच धर्तीवर म.जी.प्रा.तील जे अतांत्रिक अधिकारी / कर्मचारी उत्कृष्ट कार्य करीत आहेत, त्यांचाही गौरव करण्यांत यावा. तसेच जे अतांत्रिक अधिकारी / कर्मचारी कामात निष्काळजीपणा करतात, त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यांत यावी, असे सूचित करुन सदर कार्यक्रम म.जी.प्रा. च्या स्थापना दिनी म्हणजेच १ नोव्हेंबर रोजी आयोजित करुन प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देऊन कर्मचाऱ्यांना गौरविण्यात यावे असे निदेश मा. मंत्रीं. पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी दिले व पुढील कार्यवाही करण्यांस मा. स.स. (तां) यांना प्राधिकृत करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत मा. सदस्य सचिव यांनी बैठकीमध्ये उहापोह केला. यावर मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असे निर्देश दिले की, जेथे अल्प मुदतीसाठी गुंतवणूक केली जाते त्या बँकेत व्याजदर कमी असतील तर ती अल्प मुदतीची गुंतवणूक मुदतपुर्व काढून घेऊन, जास्त व्याज देणाऱ्या बँकेत गुंतवणूक करावी. सध्याचीं अकाऊंटिंग पध्दत ही

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

काही अंशी ॲक्रुअल बेस तर काही अंशी कॅश बेस असल्याचे सदस्य सचिव (वित्त व प्रशासन) यांनी सांगितले. त्यावर दिनांक १.४.२०१२ पासून स्टँडर्ड अकाऊंटींग प्रोसीजर लागू करण्यासाठी स्टडी ग्रुप नेमून त्यांचे अभिप्राय घ्यावेत व याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपुढे सादर करावा असे निर्देश मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी दिले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन दिनांक २४.३.२०११ ते दिनांक २०.६.०११ या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २००८-२००९ च्या वार्षिक प्रशासकीय अहवालास मान्यता देणेबाबत..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन ०८-०९ या वर्षाचा वार्षिक अहवालाबाबत संचालक मंडळास अवगत करण्यात आले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यांत आली असता, मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असे सांगितले की, वार्षिक अहवाल विलंबाने सादर केल्यास विधीमंडळामध्ये विलंबाची कारणे द्यावी लागतात. त्यामुळे म.जी.प्रा.चे वार्षिक अहवाल त्वरीत संचालक मंडळापुढे ठेऊन त्यास मान्यता घेऊन विधी मंडळापुढे विहित कालावधीत मांडण्यांत यावे. तसेच मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व. यांनी असे सूचित केले की, सन २००९-१० या वर्षाचा प्रशासकीय अहवाल संचालक मंडळाच्या पुढील बैठकीपुढे ठेवंण्यांत यावा.

**कार्यक्रम बाब क्र.५ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या विश्रामगृहाचे दर वाढविणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव (तां.) यांनी संचालक मंडळास अवगत केले. सद्य:स्थितीत मजीप्राच्या मालकीची एकूण १३ विश्रामगृहे असून, या विश्रामगृहांसाठी सद्य:स्थितीत आकारण्यात येणारे शुल्क हे अत्यल्प असून, ते त्या त्या विश्रामगृहांच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चाचा विचार करुन निश्चित करण्यात येतात, ज्यामध्ये एकसुत्रता नाही.

तथापि, शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या सर्व ठिकाणच्या विश्रामगृहांसाठी शासन निर्णय क्र.आरक्षण-२००९/प्र.क्र.८०/निव्य-२, दि.१८.१.२०१० अन्वये निश्चित केली आहेत. मजीप्राही शासनाचांच एक अंगीकृत उपक्रम असल्याने, सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दि.१८.१.२०१० च्या शासन निर्णयानुसार लागू केलेले दर मजीप्राच्या विश्रामगृहांना लागू करण्याचे प्रस्तावित असून, त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती, सदस्य सचिव (तां.) यांनी मा. संचालक मंडळास केली. त्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव (तां.) यांना प्राधिकृत करण्यात आले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना, मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असे सूचित केले की, नागपूर येथील जिवनधारा, तेलंगखेडी, नागपूर येथे व्ही.आय.पी

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

दर्जाचे एकच विश्रामगृह आहे. तेथे आणखी एक व्हीआयपी सुट मा. राज्यमंत्री यांच्यासाठी असावा, असे सुचित केले असता, यावर पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव (तां) यांना प्राधिकृत करण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र.६ : नगरपालिकेच्या विकास कामांना तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत..

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव (तां.) यांनी संचालक मंडळास अवगत केले. नगरपालिका आपल्या हद्दीत जी विकास कामे करतात, उदा. शाळा, दवाखाने, पूल, रस्ते, समाजमंदिरे इत्यादि, त्या "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांच्या कामांना म.जी.प्रा. कडून तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात येते. सदर तांत्रिक मंजूरीचे शुल्क तत्कालीन धोरणानुसार ०.५% इतके आकारण्यात येते. जे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १.२५% पेक्षा कमी आहे. सदरचे १.२५% शुल्क हे सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेच्या परिशिष्ट ५ मधील नियम-१६ अंतर्गत बाब क्र.४ तसेच परिशिष्ट-७ मधील नियम-९ (ए) च्या तरतुदीनुसार आहे.

त्यामुळे अशा कामासाठी सद्य:स्थितीत आकारण्यात येणाऱ्या ०.५% या शुल्कामध्ये किंचित वाढ करुन, ती ०.८५ टक्के इतकी मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आकारण्यात येणाऱ्या १.२५% पेक्षा कमी आकारण्याचे प्रस्तावित केले असून, त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली असून, पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र.७ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रातून केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठयाच्या देयकांसाठी सर्व समावेशक वेब बेस्ड बिलींग सॉफ्टवेअर (Web based billing software) विकसित करण्याबाबत..

सदर प्रस्तावाचे सादरीकरण श्री. अजंय सिंह, कार्यकारी अभियंता यांनी केले व त्यानुसार सदस्य सचिव (तां) यांनी संचालक मंडळास याबाबतचे सर्व फायदे व ग्राहकांना मिळणारी सुविधा तसेच त्यामुळे म.जी.प्रा.चा कमी होणारा खर्च याबाबत अवगत केले. या अनुषंगाने चर्चा करीत असताना, मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी नमूद केले की, यापुर्वी सुजल निर्मल कार्यक्रमांतर्गत मंजुर योजनेमध्ये जी तरतूद केली आहे, त्याचा

आढावा घेण्यात यावा. जेणेकरुन Duplication होणार नाही. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी निविदा मागवून कामे हाती घेतली आहेत, त्या निविदेत बिलींग सॉफ्टवेअरच्या अनुषंगाने ज्या तरतूदी असतील व ज्यांची कामे चालू असतील त्या आवश्यकतेनुसार upgrade करता येतील

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

का? त्याचप्रमाणे निविदेतील कायदेशीर तरतूदीस कोणतीही बाधा येणार नाही ना ? याचा आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याच्या अटीस अधिन राहून प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव (तां) यांना प्राधिकृत करण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र. ८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या अंधेरी, मुंबई येथील जागेचा बांधा, वापरा व हस्तांतर करा (BOT) या तत्वावर विकास करण्याच्या अनुषंगाने म.जी.प्रा.साठी आवश्यक इमारतीची वास्तुरचना करण्यासाठी वास्तुविशारदाचे (आर्किटेक्ट) नेमणूक करणेबाबत..

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव (तां.) यांनी संचालक मंडळास अवगत केले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या अंधेरी, मुंबई येथील सी.टी.एस. क्र.२२७-अ या जागेचा विकास करण्यासंदर्भात व त्यासाठी मजीप्रास आवश्यक बांधकामाची वास्तुरचना करण्यासाठी वास्तुविशारद नेमण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.१५ लक्ष खर्चास मा.संचालक मंडळाची मंजूरी प्राप्त करुन घेण्यासाठी सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना, मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी, म.जी.प्रा. च्या मालकीची एकूण किती जागा आहे, त्यापैकी किती जागा विकासकाला द्यावी लागेल. म.जी.प्रा.स सदर जागेपैकी किती एफ.एस.आय. व टी.डी.आर. मिळणार आहे, याचा संपुर्ण अभ्यास करुनच सदर प्रस्ताव पुढील बैठकीपुढे सविस्तर अहवालासह सादर करावा, असे सूचित केले.

कार्यक्रम बाब क्र. ९ : संरक्षण पाणी पुरवठा केंद्र, साकोरा, ता. निफाड, जि. नाशिक -- पालखेड धरणापासून जलशुध्दीकरणापर्यंत थेट पाईपलाईन टाकणेचा प्रस्ताव..

सदर प्रस्तावाबाबत सदस्य सचिव (तां) यांनी सादरीकरणाद्वारे संचालक मंडळास अवगत केले. सदरच्या प्रस्तावामुळे म.जी.प्रा.ला पाटबंधारे विभागास आज द्याव्या लागणाऱ्या कच्च्या पाण्याच्या परिमाणात व दरांत मोठी बचत होणार असून त्याचप्रमाणे गुरुत्वाद्वारे पाणी येणार असल्याने उर्जेची बचत देखील होणार असल्याचे संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्ताव मंजुर झाल्यास काम करण्यासाठी Deferred payment धर्तीवर निविदा मागवून नियुक्त करावयाच्या खाजगी ठेकेदाराने गुंतवणूक करुन मालमत्तेची ५ वर्षे देखभाल व दुरुस्ती करणे व त्याने केलेल्या गुंतवणूकीचा परतावा ५ वर्षे इतक्या कालावधीत म.जी.प्राने करणे या धर्तीवर करण्याचे प्रस्तावित असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

यावर चर्चेअंती प्रस्तावास तत्वतः मान्यता प्रदान करण्यात येत असून, ज्या पध्दतीने निविंदा मागविण्यांत येणार आहेत, त्याचा प्रारुप मसुदा पुढील बैठकीत सादर करुन अंतिम मान्यता प्रदान करुन घेण्याचे निर्देश देण्यांत आले. यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव (तां.) यांना प्राधिकृत करण्यात आले.

कार्यक्रम बाब क्र.१०: सदस्य सचिव, (तां) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना कार्यालयीन वापरासाठी नविन वाहन खरेदी करण्याबाबत..

सदस्य सचिव (तां) यांना कार्यालयीन कामकाजासाठी कार्यालयीन वाहन उपलब्ध नसल्याने शासनाच्या प्रचलीत नियमानुसार वाहन खरेदी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत आली.

कार्यक्रम बाब क्र. ११ : ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम -- प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात सुधारित मार्गदर्शक सूचना (अवलोकनार्थ सादर).

सदर कार्यक्रम बाबीवर या बैठकीत प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांच्या विनंतीवरुन चर्चा करण्यांत आली नाही.

कार्यक्रम बाब क्र. १२ : सन २०११-१२ मध्ये संशोधन व प्रशिक्षण या शिर्षकाखाली बर्लिन, जर्मनी येथे दिनांक १८ व १९ एप्रिल २०११ रोजी झालेल्या वॉटर समिट २०११ साठी झालेल्या खर्चाची तरतूद करणे.

मा. मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष; मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष तसेच प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग, श्रीमती भोळे उप अभियंता, मंत्री, पाणी पुरवठा यांचे विशेष कार्य अधिकारी यांच्या दिनांक १८ व १९ एप्रिल,२०११ च्या दौऱ्याचा खर्च रु. १७.१८ लक्षची तरतूद सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये राखून ठेवलेल्या संशोधन व प्रशिक्षण निधीचे पुर्ननियोजन करुन वाटप करण्यास मान्यता देण्यांत आली. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव (वित्त व प्रशासन) यांना प्राधिकृत करण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र.१३ : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी /कर्मचाऱ्यांना व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना १० टक्के व ६ टक्के महागाई भत्ता /वाढ मंजूर करण्याबाबत..

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे म.जी.प्रा. च्या अधिकारी कर्मचाऱ्यांना व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिनांक १.११.२०१० पासून १० टक्के व दिनांक १.५.२०११ पासून ६ टक्के इतका

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

महागाई भत्ता / वाढ देण्यांत यावा असे संचालक मंडळास अवगत करण्यांत आले. यावर मा. मंत्री, पा.पु. व स्व. यांनी म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांस वरील प्रमाणे महागाई भत्ता दिल्यास म.जी.प्रा. वर किती भार पडेल अशी विचारणा केली. यावर वि.सं. व मु.ले.अ. यांनी अशी माहिती दिली की, २०१०-२०११ या वित्तीय वर्षामध्ये रु.३२.३१ कोटी तुट आहे. सदर तुट सन २०११-१२ मध्येही कमी होणार नाही. मा. मंत्री तथा अध्यक्ष यांनी वरीलपैकी १ भत्ता लागू करावा असे सूचित केले. यावर प्रधान सचिव, पा.पु.व स्व. विभाग यांनी असे स्पष्ट केले की, सदर कार्यक्रम बाबींमध्ये जी आकडेवारी दिलेली आहे ती भविष्यातील योजना व प्राप्त होणाऱ्या रक्कमा या आधारे मांडण्यांत आली आहे. त्यावर मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असे सूचित केले की १० टक्के अथवा ६ टक्के यापैकी एक महागाई भत्ता देण्यांत यावा.

म.जी.प्रा. ची आर्थिक परिस्थिती पहाता म.जी.प्रा. च्या कर्मचाऱ्यांना तुर्त ५ टक्के महागाई भत्ता वाढ माहे जून,२०११ मध्ये देय होणाऱ्या वेतनापासून लागू करावा, असे सूचविले. त्यानुसार १६ टक्के ऐवजी माहे जून,२०११ पासून ५ टक्के महागाई भत्ता लागू करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली असून पुढील कार्यवाही करण्यांस मा. सदस्य सचिव (वि. व प्र.) यांना प्राधिकृत करण्यांत आले.

बैठकीस अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यांत आले.

--ooo--

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.